**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. वजीर हुसेन शेख
परमार नगर, एन-११३,
फातिमानगर, पुणे-१३

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक,सातारा
जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक,
सातारा, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११०३ + १४१२ / पुणे |
| २ | उपस्थित<br>**अपीलकर्ता** : श्री. वजीर हुसेन शेख<br>परमार नगर, एन-११३, फातिमानगर, पुणे-१३ | |

| अपील क्र. | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याच्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| ११०३ / पुणे | २३.३.२००७ | १६.४.२००७ | २१.७.२००७ | १५.१०.२००७ |
| १४१२ / पुणे | १८.५.२००७ | ७.७.२००७ | २१.८.२००७ | १५.१०.२००७ |

**<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**

**अपील क्र. ११०३ :** इंदापूर कोर्ट येथे दोषारोप पाठविणे या कामी उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी दि. ३.६.२००५ अन्वये मंजुरी मागितली होती, ती दिली असल्यास त्याची प्रत, उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी दोषारोप पाठविण्यासाठीची मंजुरी पोलीस महासंचालक यांना दि. ५.१०.२००५ चे पत्राने मागितली होती, त्यावर पोलीस महासंचालक यांनी काय आदेश अथवा त्रुटीपत्रे पाठविली त्याच्या प्रती, कोर्टात दोषारोप पाठविणेचे मंजुरीसाठी पोलीस महासंचालक/ उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्यात झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती

**अपील क्र. १४१२**

अपीलकर्त्याविरूध्द दाखल केलेल्या प्रायव्हेट खटल्यातील कागदपत्रांच्या सर्व प्रती, तपास अधिकारी यांची आठवडा डायरी व जीप लॉगबुकाच्या प्रती, पोलीस अधीक्षक व अप्पर पोलीस अधीक्षक यांनी तपासाबाबत दिलेल्या सूचना व शिफारशी इत्यादी माहिती

## विवेचन

आपल्या विरूध्दच्या खाजगी खटल्याच्या संदर्भात मागितलेली माहिती अपुरी मिळाली, तसेच काही माहिती तपास चालू असल्याचे कारण दर्शवून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८(जे) अन्वये नाकारण्यात आली] अशा कारणावरून अपीलकर्ता श्री. वजीर हुसेन शेख यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि. १६.७.२००८ व दि. २६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. सदर कार्यक्रमात अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचेत एकमत न झाल्याने सुनावणी घेण्यात आली.

आपला समावेश असलेल्या पोलीस पथकाने दाखल केलेल्या खटल्यातील आरोपींना वाचविण्याच्या हेतूने आपल्याविरूध्द खाजगी खटला दाखल करण्यासाठी खोटी कागदपत्रे बनवून आरोपींना मदत केल्याचा आरोप श्री. शेख यांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांविरूध्द अपिलात व अन्य कागदपत्रांत केला आहे. या अनुषंगाने त्यांनी माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, मुख्यालय सातारा यांनी काही माहिती दिली व तपास चालू असल्याच्या कारणावरून काही माहिती नाकारली. परंतु तपास, अटक व खटला दाखल करणे या तीनही प्रक्रिया पार पडल्या आहेत, त्यामुळे तपास चालू असल्याच्या कारणावरून माहिती नाकारणे योग्य नाही, असे प्रतिपादन श्री. शेख यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात व आयोगापुढील सुनावणीत केले.

लोकसभा निवडणुक विषयक कामामुळे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे येऊ शकणार नसल्याबाबत त्यांनी लेखी पत्राद्वारे परवानगी घेतली होती. परंतु संबंधित कागदपत्रे व लेखी निवेदन त्यांनी सादर केले.

श्री. वजीर हुसेन शेख हे सहाय्यक पोलीस निरीक्षक (निलंबित) असून म्हसवड पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर नं. २/२००५ मध्ये आरोपी असून त्यांच्याविरूध्द न्यायालयात दोषारोप सादर करण्यात आले आहेत. या अनुषंगाने विविध प्रकारची माहिती मागणारे अर्ज त्यांनी वेळोवेळी केले असून त्यांना माहिती देण्यात आली आहे, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक, सातारा श्री. धनंजय कुलकर्णी यांनी निवेदनात नमूद केले आहे.

दिलेल्या माहितीचा तपशील त्यांनी सोबत जोडला आहे. अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, सातारा श्री. प्रकाश मुत्याळ यांनी जन माहिती अधिकाऱ्यांच्या निवेदनाशी आपण सहमत असल्याचे नमूद केले आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. धनंजय कुलकर्णी व अपिलीय प्राधिकारी श्री. प्रकाश मुत्याळ यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात त्याचा पुनरूच्चार केला आहे.

श्री.शेख सातत्याने विविध प्रकारचे अर्ज करीत असून त्यांना त्या त्या वेळी माहिती देण्यात आलेली आहे. पोलीस उपअधीक्षकांनी दि. ३.६.२००५ रोजी मागितलेली मंजुरी पोलीस अधीक्षकांनी दिली होती की नाही, पोलीस महासंचाकांनी श्री. शेख यांच्या विरूध्द दोषारोपपत्र पाठविण्यास मंजुरी दिली होती की नाही, ही माहिती व त्याबाबतच्या पत्रांच्या प्रती त्यांना नाकारण्यात आल्या आहेत. अंतिम निकाल होईपर्यंत तपास चालू असतो, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे मुख्य प्रतिपादन आहे. परंतु या कारणाखाली माहिती नाकारणे योग्य नाही. न्यायालयात आरोपपत्र दाखल केल्यानंतर संबंधित माहिती दिली गेली पाहिजे.

उभय बाजूंची निवेदने व त्यांनी सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांचा विचार करून आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य.

२. उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी दि. ३.६.२००५ रोजी मागितलेली मंजुरी पोलीस अधीक्षकांनी दिली होती की नाही, तसेच पोलीस महासंचालकांनी श्री. शेख यांच्या विरूध्द दोषारोपपत्र पाठविण्यास मंजुरी दिली होती की नाही, याबाबतचे परवानगी मागणारे पत्र व त्याचे उत्तर याच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, सातारा यांनी श्री. शेख यांना आठ दिवसात निःशुल्क द्याव्या. याबाबतच्या पूर्ततेचा अहवाल दि. ५.४.२००९ पर्यंत आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि. २१.३.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रामचंद्र बाळासाहेब तांबे
मु.पो.जातेगाव खुर्द, ता.शिरुर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, शिरुर
तहसील कार्यालय शिरुर, ता.शिरुर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय शिरुर, ता.शिरुर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११२० / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, शिरुर
तहसील कार्यालय शिरुर, ता.शिरुर, जि.पुणे प्रतिनिधी श्री.आर.आर.शेळके

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय शिरुर, ता.शिरुर, जि.पुणे श्री.आर.आर.शेळके

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.६.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.८.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | **मुळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>जानेवारी ते एप्रिल २००७ या काळातील तालुक्यातील अधिकृत / अनधिकृत खाणींची संख्या, भरलेली रॉयल्टीची रक्कम किती, अनधिकृत खाणचालकांकडून दंडापोटी जमा झालेली रक्कम, खाणमालकांनी १ एप्रिल २००७ ते मार्च २००७ पर्यंत किती डबर उचलले, त्यातील अधिकृत व अनधिकृत किती. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.रामचंद्र बाळासाहेब तांबे यांनी मागितलेली माहिती त्यांना विहित मुदतीत व नि:शुल्क देण्यात आली याची नोंद घेऊन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरुर यांनी त्यांचे अपील फेटाळले. परंतु माहिती देण्यास टाळाटाळ होत असल्याचे नमूद करुन श्री.तांबे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि.१६.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'स श्री.तांबे उपस्थित नव्हते, म्हणून सुनावणी घेण्यात आली. सुनावणीलाही श्री.तांबे उपस्थित नव्हते.

श्री.तांबे यांनी दि.१९.५.२००७ रोजी माहिती मागणीचा अर्ज केला, दि.१६.६.२००७ रोजी त्यांना माहिती नि:शुल्क देण्यात आली. एवढेच नव्हे, तर आणखी माहितीची आवश्यकता असल्यास आपल्या कार्यालयात येऊन माहिती घ्यावी, असे नमूद करुन त्यानुसार श्री.तांबे यांनी मागितल्यास माहिती द्यावी, असे आदेश तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरुर यांनी दिले. विद्यमान जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी त्याचाच पुनरुच्चार केला.

## आदेश

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३१.३.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रऊफ अब्दुल रेहमान शेख
जे-२१०, कृष्णा एन्कलेव्ह, जि.अहमदनगर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नोंदणी उपमहानिरीक्षक(मुख्यालय),
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक(मुख्यालय),
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२३९ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नोंदणी उपमहानिरीक्षक(मुख्यालय),
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ श्री.ए.एच.पवार

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक(मुख्यालय),
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ श्री.सी.बी.भुरकुंडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१८.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.३.२००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** <br> **(कालावधी २८.३.२००३ ते २६.९.२००३)** <br> श्रीमती सुचेता वाव्हळ, अहमदनगर यांनी दुय्यम निबंधक कार्यालये, अहमदनगर येथील अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द केलेला तक्रारअर्ज, त्यासंबंधाने करण्यात आलेली चौकशी(जबाब) व चौकशी अहवाल. |
|---|---|

## विवेचन

श्रीमती सुचेता वाव्हळ(मयत), (हंगामी कर्मचारी दुय्यम निबंधक कार्यालय, अहमदनगर) यांनी नोंदणी व मुद्रांक नियंत्रक विभागाच्या दुययम निरीक्षक कार्यालय, अहमदनगर येथील अधिकारी व कर्मचारी यांच्या संदर्भात केलेल्या तक्रारी अर्जाच्या चौकशीबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.रऊफ अब्दुल रहेमान शेख यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्रार्धिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.शेख यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि.१६.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

श्रीमती वाव्हळ(मयत) यांचा अशा स्वरुपाचा अर्ज अभिलेखात आढळून येत नसल्याचे श्री.शेख यांना विहित मुदतीत कळविण्यात आले. त्यांच्या तक्रार अर्जाची चौकशी तत्कालीन नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी चौकशी करुन अहवाल सादर केला असल्यामुळे विधानसभेत तारांकित प्रश्न विधानसभा सदस्य श्री.अनिल राठोड यांनी उपस्थित केला, हे लक्षात घेता श्रीमती वाव्हळ यांचा अर्ज अभिलेखात आढळून येत नाही हे कारण संयुक्तिक नाही. सहाय्यक जिल्हा निबंधक, दुय्यम निबंधक, दक्षिण व उत्तर, लिपीक, रोखपाल व दस्तलेखक यांच्यामार्फत होणाऱ्या भ्रष्टाचाराची लेखी तक्रार श्रीमती वाव्हळ यांनी श्री.अण्णा हजारे यांच्याकडे पाठविली होती. त्या तक्रारी अर्जावर ही चौकशी झाली होती.

त्यांचा अहवाल मिळावा, अशी श्री.शेख यांची मागणी होती. या संदर्भात श्री.शेख यांना कार्यालयातील अभिलेख पडताळणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आले होते. त्यांनी नमूद केलेला चौकशी अहवाल हा श्री.नरसिंग लक्ष्मण गेडाम, अहमदनगर यांनी सहजिल्हा निबंधक कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द केलेल्या तक्रारी संदर्भातील आहे. तसेच श्री.अनिल राठोड यांच्या तारांकित प्रश्नाचा श्री.वाव्हळ यांच्या तक्रारी अर्जाशी काहीही संबंध नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ श्री.सी.बी.भुरकुंडे यांनी केले. श्री.गेडाम यांच्या तक्रारीबाबतच्या चौकशी अहवालाची व श्री.राठोड यांच्या तारांकित प्रश्नाबाबतची प्रतही अपीलकर्ता यांना देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. श्री.शेख प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या पहिल्या तारखेला उपस्थित राहू शकत नसल्याचे कळविण्यात आल्यामुळे दुसरी तारीख देण्यात आली. त्याहीवेळी ते उपस्थित नव्हते, असे अपिलीय प्राधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय), महाराष्ट्र राज्य,पुणे श्री.ए.एच.पवार यांनी नमूद केले.

आयोगाने आयोजित केलेल्या दि.१६.७.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त व आयोगापुढे झालेल्या सुनावणीसही अपीलकर्ता श्री.शेख हे उपस्थित नव्हते.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची निवेदने लक्षात घेता अपीलकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे, हे दिसून येते. त्यामुळे अपील अमान्य करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.३१.३.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.महादेव बाजीराव शिंदे
१५, क्वीन्स गार्डन, पारिजात बिल्डिंग,
फ्लॅट नं.८, पुरंदर वसाहत, पुणे-१ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे-१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहा. अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३२२ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.महादेव बाजीराव शिंदे
१५, क्वीन्स गार्डन, पारिजात बिल्डिंग, फ्लॅट नं.८, पुरंदर वसाहत, पुणे-१

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे-१ श्री.अ.वि.देवधर

**जन माहिती अधिकारी** तथा सहा. अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे-१ श्री.ए.डी.पवार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.८.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.८.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>वरिष्ठ लिपीक श्री.एस.एस.बळे, श्री.एस.आर.लाटणे व श्री.सी.डी.जाधव, कनिष्ठ लिपीक श्री.एस.एम.देशमुख यांचे उच्च माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र, माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र व पदवी परीक्षेचे मार्कलिस्ट याच्या छायांकित प्रती. श्री.एस.आर.हिप्परगे, कनिष्ठ लिपीक यांच्या नियुक्ती आदेशातील अधीक्षक अभियंता यांचे जा.क्र.पशा/जी४३/३०३०, दि.८.४.२००३ प्रत, शासनाकडील जा.क्र.प्रकल्प/२००२/२०११०/ प्र.क्र.२६८/सेवा-४, दि.२१.३.२००३ छायांकित प्रत, शासन, सा.प्र.वि.परिपत्रक क्र.एसआरव्ही /२००३/प्र.क्र.३/०३/१२, दि.१.८.२००३ छायांकित प्रत | |

## विवेचन

सन २००३-२००४ मध्ये दिलेल्या वरिष्ठ लिपीक सरळ सेवा भरतीमधील चार उमेदवारांच्या प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतींवर जन माहिती अधिकारी सत्यप्रत म्हणून सह्या करीत नसल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री.महादेव बाजीराव शिंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्यामुळे सदरचे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

चार उमेदवारांच्या व अन्य एका कनिष्ठ लिपीकाच्या नियुक्तीच्या संदर्भात श्री.शिंदे यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली. याबाबत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे एकमत आहे. परंतु तीन स्मरणपत्रे दिल्यावर दोन महिन्यानी उशिरा माहिती मिळाली, असे प्रतिपादन श्री.शिंदे यांनी केले. दि.२१.६.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ यांनी लिहिलेल्या पत्राची प्रत आपल्या म्हणण्याच्या पृष्ट्यर्थ त्यांनी सादर केली. प्रत्येक प्रतीवर सत्यप्रत असल्याची सही जन माहिती अधिकारी यांनी केली पाहिजे, तशी ती केली नसल्यामुळे माहिती संशयास्पद व बनावट वाटते, असे श्री.शिंदे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. परंतु श्री.शिंदे यांना विहित मुदतीत शुल्क भरण्यास कळविले होते, शुल्क भरल्यानंतर त्यांना व्यक्तिशः माहिती देऊ केली असता त्यांनी ती नाकारली. त्यामुळे त्यांना ती टपालाने पाठविण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे श्री.ए.डी.पवार यांनी नमूद केले. छायांकित प्रतीवरुन काढलेल्या प्रती दिल्या असल्यामुळे त्याची सत्यप्रत करुन देता येत नाही, मात्र माहितीसोबत दिलेल्या पत्रात या प्रमाणपत्रांचा उल्लेख केला, असेही श्री.ए.डी.पवार यांनी सांगितले. श्री.शिंदे आपल्या खात्यातच कर्मचारी असून या संदर्भातील कोणतीही कागदपत्रे देण्यास आपली तयारी आहे. संपूर्ण नस्ती श्री.शिंदे यांना दाखवून त्यांना पाहिजे असलेल्या प्रती देता येतील, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, पुणे श्री.अ.वि.देवधर यांनी केले.

श्री.शिंदे यांना संबंधित कागदपत्रांच्या प्रती देण्यात आल्या आहेत व सत्यप्रतींचा त्यांचा आग्रह असल्यामुळे कार्यालयाकडील कागदपत्रांच्या प्रती असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी सहीशिक्क्यानिशी द्यावे असा आदेश आपण दिला व त्यानुसार सर्व प्रती श्री.शिंदे यांना देण्यात आल्या आहेत, असेही श्री.देवधर यांनी सांगितले, अपीलकर्ता यांनी ते मान्य केले.

संबंधित प्रमाणपत्रे मूळ भरतीच्या वेळी दाखल केलेली नव्हती, ती अन्य जिल्ह्यामधून नंतर प्रमाणित करुन मागविण्यात आली. आपण माहितीची मागणी केल्यानंतर ही कागदपत्रे तयार करण्यात आली. मुळात भरतीच्या वेळी या कागदपत्रांची पूर्तता झाली नसल्याचा संशय त्यामुळे

येतो. त्यामुळे भरती प्रक्रिया चुकीची आहे, असे प्रतिपादन श्री.शिंदे यांनी केले. मात्र भरती प्रक्रिया योग्य की अयोग्य, तसेच प्रमाणपत्राची वैधता हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

(विजय कुंवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.३.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रकाश किसन काळोखे
मु.पो.देहूगाव, ता.हवेली, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, हवेली, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत, देहूगाव(विठ्ठलवाडी), ता.हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३३१ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रकाश किसन काळोखे
मु.पो.देहूगाव, ता.हवेली, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, हवेली, जि.पुणे श्री.विष्णू लोखंडे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत देहूगाव(विठ्ठलवाडी),
ता.हवेली, जि.पुणे श्री.एल.बी.शिंगाडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१६.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३१.८.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.८.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>स्वच्छतागृह पाडण्याबाबत दि.२३.२.२००७ ते आज अखेरची कार्यवाही, स.नं.११/२ब मध्ये संमतीपत्रे आहेत का, ग्रामपंचायत मासिक सभेत बांधकाम ठराव झाला आहे का, शासकीय कोणत्या फंडातून काम झाले आहे, स्वच्छतागृह ५.१०, २०.६ व ३.११.२००६ काय कार्यवाही केली, १९.७.२००६ चे पत्र शेतजमिनीवर विनापरवाना व अतिक्रमणाबाबत काय कार्यवाही केली, दि.२५.७.२००६ अतिक्रमणाबाबत काय कार्यवाही केली, दि.१०.१०.२००६ चे बांधकाम परवाना ठरावाची माहिती व नक्कल, स्च्छतागृहाची माहिती १९९४-९५, परवाना माहिती २००६ | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.प्रकाश किसन काळोखे यांनी देहू गावातील स्वच्छतागृहांच्या व शेतजमिनीवरील विनापरवाना बांधकाम व अतिक्रमण याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, देहूगाव(विठ्ठलवाडी), ता.हवेली, जि.पुणे यांच्याकडे मागितली होती. ती न मिळाल्यामुळे त्यानी केलेल्या अपिलाची अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, हवेली, जि.पुणे यांनी विहित मुदतीत दखल घेतली नाही म्हणून श्री.काळोखे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

जन माहिती अधिकारी, पुणे जिल्हा परिषद, पुणे व गटविकास अधिकारी, पंचायत समिती, हवेली आदिंकडेही श्री.काळोखे यांनी या स्वरुपाचे अर्ज केले होते, त्यांनी ते ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, देहूगाव(विठ्ठलवाडी), ता.हवेली, जि.पुणे यांच्याकडे वर्ग केले होते.

आयोगाने आयोजित केलेल्या दि.२१.१०.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, देहूगाव (विठ्ठलवाडी), ता.हवेली श्री.पांडुरंग गेनू पावडे व अपीलकर्ता या कार्यक्रमाला उपस्थित नव्हते. मात्र अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत) श्री.बी.टी.पवार हे उपस्थित होते. श्री.काळोखे यांनी विहित मुदतीनंतर अपील केले, ते फेटाळण्यात. आले परंतु माहिती देण्याबाबत

ग्रामविकास अधिकारी यांना दि.२७.९.२००७ रोजी लेखी कळविण्यात आले होते, त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली असल्याचे नमूद करुन अपील निकाली काढण्याची शिफारस त्यांनी केली होती. शास्ती करण्यात येऊ नये, असेही त्यांनी प्रपत्रात नमूद केले होते. मात्र 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'चे पत्र आपल्याला न मिळाल्यामुळे आपण उपस्थित राहू शकलो नाही व आपल्याला आजअखेर कोणत्याही प्रकारची माहिती मिळालेली नाही, असे अपीलकर्ता श्री.काळोखे यांनी दि.६.१.२००९ रोजी आयोगाला कळविले. ते लक्षात घेऊन अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

अनधिकृतपणे बांधलेली स्वच्छतागृहे तक्रारी करुनही व अतिक्रमणात असूनही पाडली जात नाहीत, अशी तक्रार श्री.काळोखे यांनी आयोगापुढील सुनावणीत केली. तसेच आपल्याला अद्यापही माहिती दिली गेली नसल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. श्री.पांडुरंग नामदेव पावडे हे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, देहूगाव(विठ्ठलवाडी), ता.हवेली, जि.पुणे होते, ते सध्या निलंबित आहेत, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी श्री.एल.बी.शिंगाडे व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.विष्णू लोखंडे यांनी नमूद केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यास कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही, हे स्पष्ट होते. तरीही अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत) श्री.बी.टी.पवार यांनी माहिती देण्यात आल्याचे लिहिणे ही दिशाभूल आहे. अशा प्रकारची असत्य नोंद करुन, शास्ती न करण्याची व अपील निकाली काढण्याची शिफारस त्यांनी करणे आक्षेपार्ह असून आयोग याची गंभीर दखल घेत आहे.

## **<u>आदेश</u>**

(१) अपील मान्य.

(२) मूळ अर्जानुसार अपीलकर्त्याने मागितलेली माहिती सुनावणीच्या दिनांकापासून आठ दिवसात नि:शुल्क देण्याचा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्याबाबतच्या पूर्ततेचा अहवाल विद्यमान ग्रामविकास अधिकारी श्री.एल.बी.शिंगाडे यांनी दि.१०.४.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(३) विहित मुदतीत माहिती न देण्याबद्दल तत्कालीन ग्रामविकास अधिकारी श्री.पांडुरंग नामदेव पावडे यांना रु.२५००० शास्ती लावण्यात येत आहे. तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांच्याकडून ही शास्ती मे २००९ मध्ये आदा केल्या जाणाऱ्या एप्रिल २००९च्या पगारापासून पाच हप्त्यात वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१) या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही गटविकास अधिकारी, पंचायत समिती, हवेली, जि.पुणे यांनी करुन व याची नोंद श्री.पावडे यांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात घेऊन तसा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.' पहिली कपात दि.१०.५.२००९ पर्यंत करावयाची आहे.

(४) मूळ माहिती दिलेली नसताना माहिती दिल्याची असत्य नोंद करुन खोटी व दिशाभूल करणारी माहिती आयोगाला पुरवून परिणामी मूळ माहिती नाकारण्यात सहभागी असल्याबद्दल विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, हवेली श्री.बी.टी.पवार यांना रु.५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. श्री.पवार यांच्याकडून ही शास्ती मे २००९मध्ये आदा केल्या जाणाऱ्या एप्रिल २००९ च्या पगारातून वसूल करुन ती दि.१०.५.२००९ पर्यंत '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१) या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही गटविकास अधिकारी, पंचायत समिती, हवेली, जि.पुणे यांनी करुन व याची नोंद श्री.पवार यांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात घेऊन तसा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

(५) वरील सर्व कार्यवाहीची पूर्तता व जबाबदारी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, हवेली यांची राहील. त्यांनी वरील ३ व ४ मधील बाबींची पूर्तता करुन आयोगाला १५.५.२००९ पर्यंत अहवाल सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०.३.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अनिल भगवानराव सातव
मु.पो.संकेत अपार्टमेंट, स्टेट बँकेसमोर,
भिगवण रोड, बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त व प्रादेशिक संचालक,
नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
बारामती नगरपरिषद, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४०१ / पुणे /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त व प्रादेशिक संचालक,
नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे श्री.पकाश पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
बारामती नगरपरिषद, ता.बारामती, जि.पुणे श्री.किरणराज यादव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.१.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.७.२००७ |
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>सन १९९०-१९९१ पासूनचे जुने बांधकाम परवानगी व आता चालू बांधकाम व सन १९९९ ते २००१ साली झालेले बांधकाम परवानगीचे नकाशे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.अनिल भगवानराव सातव यांनी मागितलेली माहिती विस्तृत होती. त्यातील काही माहिती नगरपरिषदेकडील नव्हती, असे नमूद करुन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद, ता.बारामती यांनी ती नाकारली. अवलोकनासाठी त्यांनी श्री.सातव यांना कागदपत्रे उपलब्ध करुन दिली. याची नोंद घेऊन अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त व प्रादेशिक संचालक, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी अपील फेटाळले. आपल्याला चुकीची माति मिळाल्याचे श्री.सातव यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले. जन माहिती अधिकारी उपस्थित नसल्यामुहे उभय बाजूंमध्ये एकमत झाले नाही. त्यामुळे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

श्री. सातव यांनी कागदपत्रे पाहिली असून हव्या असलेल्या छायांकित प्रती त्यांना देण्यात आल्या आहेत व आपली तक्रार राहिली नसल्याचे त्यांनी दि.१६.१.२००८ रोजी लेखी दिले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद श्री.किरणराज यादव यांनी त्या पत्राच्या प्रतीसह निवेदन केले. एका इमारतीतील वापराचे उद्दिष्टात बदल केल्याबाबत व त्यामुळे नागरिकांना त्रास होत असल्याबाबत श्री.सातव यांनी तक्रार केली होती. त्याबाबत कार्यवाही करुन त्यांना तसे कळविण्यात आले आहे, असेही श्री.किरणराव यादव यानी नमूद केले.

या बाबींचा विचार करता अपीलकर्त्याला आवश्यक असलेली माहिती देण्यात आली आहे, असे स्पष्ट होते. अपिलीय प्राधिकारी यांनीही याला दुजोरा दिला. प्रशासकीय कार्यवाही मागणीही पूर्ण करण्यात आली आहे, त्यामुळे अपील अमान्य करण्यात येत आहे.

## आदेश

अपील अमान्य.

पुणे
दि. ३१.३.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सुहास पांढरे
१८, शिवप्रसाद सोसायटी, गणेशमळा,
पुणे-४११ ०३० अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त, उत्तरवादी
परिमंडळ २, पुणे शहर, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
सहकारनगर पोलीस स्टेशन,

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४१४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सुहास पांढरे
१८, शिवप्रसाद सोसायटी, गणेशमळा, पुणे-४११ ०३०

**जन माहिती अधिकारी** तथा वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
सहकारनगर पोलीस स्टेशन, पुणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.१०.२००७ |

**८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सहकारनगर पोलीस स्टेशन मधील मयत रजिस्टर नं.१३९/०४ सी.आर.पी.सी. १७४ दि. ११.१२.२००३ या केसमधील अेफआयआर, चार्जशीट, फिर्यादीचा जबाब, साक्षदारांची टिप्पणी, पंचनामा, घटनास्थळाचा पंचनामा, अंतिम पोस्ट मार्टम रिपोट व इतर अनुषंगिक कागदपत्रांच्या प्रती

## विवेचन

सौ.रचना सुहास पांढरे यांच्या मृत्यू प्रकरणातील पोलिसांकडील सर्व कागदपत्रांच्या प्रती आपल्याला जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सहकारनगर पोलीस स्टेशन, पुणे यांच्याकडून मिळाल्या नाहीत व अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-२ यांनी अपील मान्य करुन सहाय्यक पोलीस आयुक्त, वानवडी विभाग, स्वारगेट पोलीस ठाणे यांच्याकडून माहिती घेण्यास सांगितले. परंतु योग्य व पूर्ण माहिती मिळाली नाही, या कारणावरुन अपीलकर्ता श्री. सुहास पांढरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि. २१.१०.२००८ व दि. २६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. सदर कार्यक्रमास जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे उपस्थित नव्हते. त्यामुळे सदर अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

आपल्याला पूर्ण माहिती मिळावी व आपल्या अर्जानुसार संबंधितांवर कारवाई व्हावी, अशी मागणी श्री. पांढरे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नोंदविली.

या प्रकरणी महत्वाची कागदपत्रे नष्ट करून मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला आहे. त्यामुळे अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-२ यांनी संबंधितांना तूर्तातूर्त निलंबित करुन संपूर्ण रेकॉर्ड सील करावे व राज्य माहिती आयुक्तांना अहवाल सादर करावा, अशी मागणी श्री. पांढरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.१२.२००७ च्या अर्जान्वये केली आहे. मात्र अशा स्वरुपाची कारवाई हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नाही. तसेच, 'सौ. पांढरे यांच्या मृत्यू प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद सहकारनगर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. ससून रुग्णालयातील उत्तरीय तपासणीनंतर या अकस्मात मृत्यू प्रकरणाची नैसर्गिक मृत्यू वर्गवारी दि.२३.७.२००७ रोजी मंजूर करण्यात आली आहे. आकस्मात मृत्यू प्रकरणातील कागदपत्रे श्री. पांढरे यांना देण्यात आली आहेत. त्यांनी मागणी केलेली अन्य कागदपत्रे या प्रकरणांत नसल्याने देता आलेली नाहीत,' असे जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अरुण पाटील यांनी आयोगाला लेखी व तोंडी अवगत केले. हे लक्षात घेता नसलेल्या कागदपत्रांची मागणी ग्राह्य मानता येणार नाही.

आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

अपील अमान्य.

पुणे
दि. २६.३.२००८

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ